# लवाद, नगर रचना परीयोजना नैना क्र.४, नैना यांचे कार्यालय

आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग), शिल्लोत्तर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग)

## जाहीर सूचना

क्रमांक: लवाद /नरयो-४/साधारण/२०२३/०७

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) च्या कलम ६८ (२) मधील तरतुदीनुसार सिडको नैना प्रारुप नगर रचना योजना क्र. ४ ही योजना उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांचेकडील अधिसूचना क्रमांक सिडको/नैना/टीपीएस-४/प्रा.यो./२०२२/५६३ दिनांक २१ ऑक्टोबर २०२२ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त् अधिसूचना ही महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधरण भाग-२ मध्ये दिनांक ४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रसिध्द् झालेली आहे.

उपनिरिर्दिष्ट् नगर रचना योजनेतील सर्व संबंधीतांना या सूचनेद्वारा जाहीर करण्यात येते की, कलम ७२ मधील तरतुदीप्रमाणे, नैना प्रारुन नगर रचना योजना क्र. ४. ला अंतिम स्वरुप देण्यासाठी निन्मस्वाक्षरीकार यांची लवाद म्हणून नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील कलम ७२(१) खालील अधिसूचना क्र.टीपीएस-१२२२/२१५२/प्र.क्र. १४८/२२/नवि -२२ दिनांक २ डिसेंबर २०२२ अन्वये नियुक्ती केली असून सदरहू अधिसूचना दिनांक २३-२९ मार्च २०२३ रोजीचे महाराष्ट्र शासन राजपत्र कोकण विभाग पुरवणी, पान क्र. १ यावर प्रसिध्द झालेली आहे.

तसेच सर्व हितसंबंधीतांना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ७२ मधील तरतुदीनुसार आणि त्याअंतर्गत केलेल्या महाराष्ट्र नगर रचना योजना नियम १९७४ च्या नियम १३ नुसार, या सूचनेद्वारे जाहीर कळविण्यात येते की, आज दिनांक ०५/०४/२०२३ रोजी नियुक्त् लवाद यांनी वरील योजने संदर्भात लवादीय कामकाजास सुरवात केली आहे आणि या योजनेमुळे बाधित झालेल्या जमीन धारकांना प्रत्यक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडण्यासाठी यथावकाश लेखी सूचनेद्वारे त्यांचेकडून कळविण्यात येणार आहे. या योजने संदर्भात ज्यांना काही प्रस्ताव किंवा सूचना दयावयाच्या असतील त्यांनी त्या लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना ६० दिवसाच्या कालावधीत दाखल करावयाच्या आहेत.

वरील प्रमाणे योजना तयार केल्यामुळे, ज्या जमीन धारकांच्या कोणत्याही मिळकती बाधित (Injuriously Affected) होतील आणि त्यामुळे कलम १०२ प्रमाणे यासंदर्भात मोबदला देय असेल त्यांनी निन्मस्वाक्षरीकार यांचेकडे, सदरहू नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द् झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, त्यांची मागणी दाखल करणे आवश्यक राहील.

तसेच याद्वारे जाहीर करण्यात येते की, वरील शासन मंजूर प्रारुप योजना अंतिम करण्यासंदर्भात, अधिनियमांच्या कलम ७२ मधील तरतुदींप्रमाणे कार्यवाही करताना, या योजनेची प्रथमत: प्राथमिक न.र.यो आणि अंतिम न.र.यो याप्रमाणे उपविभागणी करुन तदनंतर पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येणार आहे.

(श्रीरंग लांडगे)
लवाद,
नगर रचना परियोजना नैना क्र. ४
आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग),
शिल्लोत्तर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग)

दिनांक-०५/०४/२०२३

पत्ता : नैना कार्यालय, टॉवर नं. १०, आठवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर- नवी मुंबई – ४००६१४

**OFFICE OF THE ARBITRATOR, TOWN PLANNING SCHEME NO. 4, NAINA**
**(Adai(pt), Akurli(pt), Nevali(pt), Shillottar Raichur(pt), and Pali Devad(pt))**

# Public Notice

(Under Rule no.13 of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974)

No. ARB/TPS-4/GEN/2023/ 07

The NAINA draft Town Planning Scheme No.4 in Adai(pt), Akurli(pt), Nevali(pt), Shillottar Raichur(pt), and Pali Devad(pt) of Taluka – Panvel, District – Raigad has been sanctioned by the Vice Chairman & Managing Director, CIDCO under sub Section (2) of section 68 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereafter referred to as "the said Act") vide Notification No. CIDCO/NAINA/TPS-4/Draft Scheme/2022/563 dated 21st October, 2022, in exercise of the powers delegated to him by Urban Development Department vide Notification No.TPS-1817/973/C.R.103/17/UD-13, dated 13th September, 2017. The said Notification is published in Maharashtra Government Gazette, Extraordinary, Part-II dated 4th November, 2022.

The Government of Maharashtra, Urban Development Department has appointed Shri Shrirang D.Landge, Retired Director of Town Planning as the Arbitrator for the said sanctioned Draft Scheme vide Notification No.TPS-1222/2152/CR-148/22/UD-12 dated 2nd December, 2022 under sub-section (1) of Section 72 of the said Act. This Notification has been appeared in the Maharashtra Government Gazette, Konkan Division supplement, Part –I, dated 23rd -29th March, 2023 on page No.1.

I, the undersigned therefore in accordance with Rule No.13 of Maharashtra Town Planning Schemes Rules 1974, declare by this Notice that, I have commenced the duties as Arbitrator for NAINA Town Planning Scheme No.4 in Adai(pt), Akurli(pt), Nevali(pt), Shillottar Raichur(pt), and Pali Devad(pt)) from 5th April, 2023.

All the owners of the lands included in this Town Planning Scheme will be served with special notice in form No.4 to submit their suggestions or objections in respect of proposals of the sanctioned draft Town Planning Scheme in due course.

Those owners or interested persons of the lands included in the Town Planning Scheme No.4, who have been injuriously affected by making of this scheme are hereby informed that they shall be entitled to make a claim of compensation as per Section 102 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, before the undersigned within a period of 60 days from the date of appearing this Notice in the *Maharashtra Government Gazette.*

It is hereby declared that the said draft Town Planning Scheme No.4 shall be sub-divided in to a preliminary scheme and final scheme as per the provision under Section 72 of the said act and processed further.

श्री.लांडगे

**(Shrirang D.Landge)**
**Arbitrator**
Town Planning Scheme No. 4, NAINA
(Adai(pt), Akurli(pt), Nevali(pt), Shillottar
Raichur(pt), and Pali Devad(pt))

Dated: 5th April, 2023
Place: NAINA Office, 7th floor, Tower No. 10,
Belapur Railway Station Complex, C.B.D. Belapur- 400 614.